


# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २८५ वा ❑ रविवार दि.११ जानेवारी २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

# ट्रम्पच्या निशाण्यावर आता ग्रीनलँड

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

व्हेनेझुएलानंतर, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आता ग्रीनलँडवर लक्ष केंद्रित करत आहेत. ट्रम्प यांनी ग्रीनलँडला आपल्यात विलीन करण्याची आपली वचनबद्धता पुन्हा व्यक्त केली आहे. दरम्यान, डेन्मार्क आणि ग्रीनलँडच्या नेत्यांनी ट्रम्पच्या विधानावर आक्षेप घेतला आहे. ट्रम्प यांचा युक्तिवाद आहे की ग्रीनलँड राष्ट्रीय सुरक्षेसाठी आवश्यक आहे. आता प्रश्न असा आहे की ट्रम्प ग्रीनलँड का मिळवू इच्छितात, त्याचा चीन आणि रशियाशी काय संबंध आहे आणि ते मिळवणे किती कठीण असेल?

व्हाईट हाऊसमध्ये तेल आणि वायू क्षेत्रातील कार्यकारी अधिकाऱ्यांच्या बैठकीत बोलताना ट्रम्प यांनी आपल्या विधानाचा पुनरुच्चार केला. त्यांनी स्पष्ट केले की, खनिजांनी समृद्ध असलेले हे बेट अमेरिकेच्या राष्ट्रीय सुरक्षेसाठी अत्यंत आवश्यक आहे. तसेच जर राजनैतिक मार्गाने ग्रीनलँड खरेदी करणे शक्य झाले नाही, तर अमेरिकेला 'कठोर मार्गाचा' अवलंब करावा लागू शकतो असेही त्यांनी यावेळी सूचित केले.

व्हेनेझुएलावरील लष्करी कारवाई, राष्ट्राध्यक्ष मादुरो यांची अटक आणि त्यानंतर व्हेनेझुएलावर अमेरिकेकडून राज्य करण्याची घोषणा यादरम्यान, ग्रीनलँडबद्दल चर्चा सुरू झाली आहे. असे म्हटले जाते की अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आता ग्रीनलँडला लक्ष्य करत आहेत. ते कोणत्याही परिस्थितीत ते अमेरिकेच्या नियंत्रणाखाली आणू इच्छितात. व्हेनेझुएलाच्या मुद्द्यावर झालेल्या मोठ्या पेचप्रसंगानंतर ते लगेच कारवाई करतील यात शंका नाही, परंतु ट्रम्प कधीही काहीही करण्याची क्षमता बाळगण्यासाठी ओळखले जातात, त्यामुळे कोणतीही शक्यता किंवा भीती नाकारता येत नाही.

ग्रीनलेंड हा आर्क्टिक प्रदेश एक असा भूभाग आहे जो येत्या काही दशकांत जगातील सर्वात सामरिक, आर्थिक आणि सामरिकदृष्ट्या महत्त्वाचा प्रदेश बनू शकतो.

ग्रीनलँड हे जगातील सर्वात मोठे बेट आहे आणि ते उत्तर अटलांटिक आणि आर्क्टिक दरम्यान द्वारपाल म्हणून काम करते. आर्क्टिक हे अमेरिकेच्या सुरक्षा धोरणासाठी फार पूर्वीपासून महत्त्वाचे आहे, कारण हा प्रदेश रशिया आणि उत्तर अमेरिकेमधील सर्वात लहान मार्ग प्रदान करतो. शीतयुद्धाच्या काळापासून अमेरिकेने तेथे लष्करी आणि रडार-आधारित उपस्थिती कायम ठेवली आहे. ग्रीनलँडमधील यूएस थुले (पूर्वी पिटुफिक स्पेस बेस म्हणून ओळखले जाणारे) ऐतिहासिकदृष्ट्या क्षेपणास्त्र इशारा आणि अंतराळ पाळत ठेवण्याच्या क्रियाकलापांशी संबंधित आहे. आर्क्टिकमध्ये वाढत्या हालचालींसह, अशा तळाचे धोरणात्मक मूल्य वाढते. अमेरिकेच्या दृष्टिकोनातून, ग्रीनलँडवर मजबूत पकड म्हणजे उत्तर ध्रुवाजवळील एका महत्त्वपूर्ण प्रदेशावर प्रभाव.

चीन आणि रशियाच्या वाढत्या स्वारस्याच्या संदर्भात ग्रीनलँडची अनेकदा चर्चा केली जाते. रशियाने आर्क्टिकमध्ये आपली लष्करी पायाभूत सुविधा आणि शिपिंग क्षमता मजबूत केली आहे. स्वतःला आर्क्टिक जवळचा देश म्हणवणाऱ्या चीनने संशोधन, गुंतवणूक आणि संभाव्य शिपिंग मार्गांमध्ये रस व्यक्त केला आहे. आर्क्टिकमध्ये स्पर्धक शक्तींचा वाढता आर्थिक/सामरिक प्रवेश भविष्यात सागरी मार्ग, संसाधने आणि पाळत ठेवण्याची व्यवस्था यावरील वर्चस्वाला धोका निर्माण करू शकतो याची अमेरिकेला चिंता आहे. या गतिमानतेमध्ये ग्रीनलँड हा एक महत्त्वाचा घटक आहे, जो आर्क्टिक क्रियाकलापांवर लक्ष ठेवण्यासाठी आणि आवश्यकतेनुसार धोरणात्मक दबाव आणण्यासाठी एक व्यासपीठ प्रदान करतो.

कोणत्याही एका देशाची महत्त्वाच्या खनिजांवर मक्तेदारी असू नये. जर ग्रीनलँडमध्ये या संसाधनांचे व्यावसायिक शोषण वाढले तर ते अमेरिकेसाठी एक पर्यायी आणि धोरणात्मकदृष्ट्या सुरक्षित प्रदेश बनू शकते. ट्रम्पच्या व्यवहार आणि मालमत्ता दृष्टिकोनात, अशा प्रदेशाचे मूल्य केवळ जमीन नाही तर भविष्यातील पुरवठा साखळी सुरक्षा देखील आहे.

ग्रीनलँड मिळवणे किंवा ते युनायटेड स्टेट्समध्ये समाकलित करणे हे व्यवहारात अत्यंत कठीण आहे. सार्वभौमत्व आणि आंतरराष्ट्रीय कायदा यामध्ये सर्वात मोठे अडथळे निर्माण करतात. ग्रीनलँड डेन्मार्कमध्ये आहे आणि त्याला व्यापक स्वायत्तता आहे. कोणत्याही हस्तांतरणाची कायदेशीर आणि राजकीय प्रक्रिया अत्यंत गुंतागुंतीची असेल. आधुनिक जगात, स्थानिक लोकसंख्येची स्पष्ट संमती असेल तरच प्रदेशाचे हस्तांतरण कायदेशीर आणि शाश्वत मानले जाते.

# अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २८ जाने.- १ फेब्रुवारी रोजी

## महोत्सवात भारतीय सिनेमा स्पर्धा विभागाचा समावेश, जगभरातील ७० फिल्म्सचे होणार प्रदर्शन

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर : जगभरातील सर्वोत्कृष्ट चित्रपट मराठी रसिकांपर्यंत पोहोचवणाऱ्या अकराव्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाची घोषणा करण्यात आली आहे. बुधवार, दि. २८ जानेवारी ते रविवार, दि. १ फेब्रुवारी २०२६ या दरम्यान हा महोत्सव आयनॉक्स थिएटर प्रोझोन मॉल, छत्रपती संभाजीनगर येथे राष्ट्रीय – आंतरराष्ट्रीय पातळीवरील कलावंताच्या मांदियाळीत संपन्न होणार आहे.

नाथ ग्रुप, एमजीएम विद्यापीठ, यशवंतराव चव्हाण सेंटर प्रस्तुत व मराठवाडा आर्ट कल्चर व फिल्म फाउंडेशन आयोजित अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव हा सुचना एवं प्रसारण मंत्रालय, भारत सरकार व सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने संपन्न होत असून प्रोझोन मॉल, कालिका स्टील व सॉलीटेअर टॉवर्स यांचे विशेष सहकार्य या फेस्टिव्हलला मिळालेले आहे. एनएफडीसी व महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळ, महाराष्ट्र शासन यांची सहप्रस्तुती असणार आहे.

आजपर्यंतचे जागतिक दर्जाचे सर्वोत्कृष्ट चित्रपट मराठी रसिकांपर्यंत पोहोचावेत, चित्रपट दिग्दर्शक, तंत्रज्ञ, कलावंत व युवा पिढीतील सिनेमाची आवड असणाऱ्या कलाकारांना हक्काचे व्यासपीठ मिळून कला व तांत्रिक पातळीवर चित्रपटाचे रसग्रहण होत चित्रपट जाणिवा अधिक सशक्त व समृद्ध व्हाव्यात, मराठवाडा व छत्रपती संभाजीनगरचे नाव चित्रपटाच्या निर्मितीच्या अंगाने सांस्कृतिक केंद्र म्हणून व प्रोडक्शन हब म्हणून जागतिक पातळीवर पोहोचावे, छत्रपती संभाजीनगर शहरातील पर्यटन राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील पर्यटकांपर्यंत पोहोचावे, मराठवाडा विभागातील गुणवंत कलावंतांना चित्रपट दिग्दर्शक, चित्रपट विषयातील तज्ज्ञ व तंत्रज्ञांपर्यंत पोहोचता यावे, त्यांच्यासोबत संवाद साधता यावा तसेच आताचा मराठी सिनेमा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत पोहोचावा, हा या महोत्सव आयोजनामागे उद्देश आहे.

महोत्सवाच्या पाच दिवसांच्या कालावधीत भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे. महोत्सवात मागील वर्षाप्रमाणे भारतीय स्पर्धा गटाचा समावेश करण्यात आलेला आहे. यात विविध भारतीय भाषांतील नऊ सिनेमांचा समावेश असून पाच राष्ट्रीय पातळीवरील ज्युरी हे प्रेक्षकांसह चित्रपट पाहणार आहेत. यातील सर्वोत्कृष्ट भारतीय चित्रपटाला सुवर्ण कैलास पारितोषिक व एक लक्ष रूपये देण्यात येणार आहे. तसेच सर्वोत्कृष्ट पटकथा, सर्वोत्कृष्ट कलाकार (स्त्री/पुरुष) या वैयक्तिक पारितोषिकांचा देखील समावेश असणार आहे.




भारतीय सिनेमा स्पर्धा गट ज्युरी समितीचे अध्यक्ष आंतरराष्ट्रीय ख्यातीचे ध्वनी संयोजक, ऑस्कर पुरस्कार विजेते पद्मश्री रसूल पुकूट्टी (कोचीन) हे असणार आहेत. तर ज्युरी सदस्य म्हणून ज्येष्ठ दिग्दर्शक अनिरूध्द रॉय चौधरी (कोलकाता), ज्येष्ठ संकलक आरती बजाज (मुंबई), ज्येष्ठ छायाचित्रणकार राफे मेहमूद (मुंबई) व ज्येष्ठ पटकथा लेखक उर्मी जुवेकर (मुंबई) हे मान्यवर असणार आहेत.

फिप्रेसी ही चित्रपट समीक्षकांची आंतरराष्ट्रीय संघटना आहे. फिप्रेसी भारत हे जगभरातील महोत्सवांमधून उत्तम चित्रपट निवडून त्यांना पुरस्कार प्रदान करतात. त्या पुरस्कारांना आंतरराष्ट्रीय सन्मान मानला जातो. त्यांचे तीन विशेष ज्युरी महोत्सवातील आताच्या पिढीतील ज्या दिग्दर्शकांच्या कारकिर्दीतील पहिले अथवा द्वितीय सिनेमे असणार आहेत त्यांचे विशेष परीक्षण करणार आहेत. या समितीचे ज्युरी अध्यक्ष ज्येष्ठ चित्रपट समीक्षक डॉ.सी.एस. व्यंकटीस्वरन (कोचीन) तर डॉ.मीनाक्षी दत्ता (दिब्रुगड) व एम.एम. व्हेट्टीकाड (नवी दिल्ली) हे मान्यवर या समितीत असणार आहेत.

चित्रपट महोत्सवाचा उद्घाटन सोहळा बुधवार, दि. २८ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ६.०० वाजता रूक्मीणी सभागृह, एमजीएम परीसर, छत्रपती संभाजीनगर येथे संपन्न होणार आहे. या महोत्सवाचे उद्घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. या प्रसंगी महोत्सवाचे मानद अध्यक्ष व प्रसिध्द दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर व ऑस्कर पुरस्कार विजेते प्रसिद्ध ध्वनी संयोजक पद्मश्री रसूल पुक्कूट्टी यांची उपस्थिती असणार आहे. या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून एनएफडीसीचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाश मकदुम, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, संयोजन समितीचे अध्यक्ष नंदकिशोर कागलीवाल, एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, एमजीएमचे उपाध्यक्ष डॉ.पी.एम.जाधव, कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, महोत्सव संचालक सुनील सुकथनकर, महोत्सवाचे कार्यकारी संचालक चंद्रकांत कुलकर्णी, कालिका स्टीलचे अरूण अग्रवाल, प्रोझोनचे सेंटर डायरेक्टर व वरिष्ठ उपाध्यक्ष कमल आर. सोनी उपस्थित राहणार आहेत. उद्घाटन सोहळ्यानंतर रात्री ९ वा. आयनॉक्स, प्रोझोन मॉल येथे यावर्षीची जागतिक पातळीवरील नावाजलेला व सध्या ऑस्कर पुरस्काराच्या शर्यतीत असलेली स्पॅनिश/फ्रेंच भाषेतील, ऑलिव्हर लॅक्से दिग्दर्शित चित्रपट सिराट महोत्सवाचा उद्घाटकीय चित्रपट म्हणून प्रदर्शित केला जाणार आहे. उद्घाटन सोहळ्यानंतर पुढील चार दिवस महोत्सव आयनॉक्स, प्रोझोन मॉल येथे संपन्न होईल.

महोत्सवाचा समारोप सोहळा रविवार, दि. ०१ फेब्रुवारी २०२६ रोजी सायं. ५ वाजता आयनॉक्स प्रोझोन मॉल येथे संपन्न होणार आहे. प्रसिध्द दिग्दर्शक व निर्माते आनंद एल. राय व ऑस्कर विजेते साउंड डिझायनर रसूल पुक्कूट्टी यांच्या प्रमुख उपस्थितीत समारोप सोहळा संपन्न होईल.

सुवर्ण कैलास पुरस्कार वितरण सोहळ्यानंतर अकराव्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा समारोप यंदाच्या ऑस्कर पुरस्काराच्या शर्यतीतील महत्वपूर्ण चित्रपट प्रसिध्द दिग्दर्शक जफर पनाही दिग्दर्शित इट वॉज जस्ट अॅन अॅक्सिडेंड (फारसी) दाखविण्यात येणार आहे.

महोत्सवाच्या पाच दिवसांच्या कालावधीत चित्रपट प्रदर्शनांबरोबरच विविध भरगच्च कार्यक्रमांचे देखील आयोजन करण्यात आलेले आहे. गुरुवार, दि. २९ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १२ वाजता आयनॉक्स, प्रोझोन मॉल येथे 'मंजूमल बॉइज' या प्रसिध्द सिनेमाचे युवा दिग्दर्शक चिदंबरम यांच्या समवेत विशेष संवाद आयोजित करण्यात आलेला आहे. दिग्दर्शक ज्ञानेश झोटिंग हे या सत्राचे संवादक असतील.

गुरूवार, दि. २९ जानेवारी २०२६ रोजी सायं ६ वा. आयनॉक्स, प्रोझोन मॉल येथे 'मराठी चित्रपटांचा बदलता चेहरा' या विषयावर विशेष परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. या परिसंवादात 'आत्मपॅम्फ्लेट' या चित्रपटाचे दिग्दर्शक, राष्ट्रीय पुरस्कार विजेते आशिष बेंडे, 'साबरबोंड' या चित्रपटाचे दिग्दर्शक रोहन कानवडे, चित्रपट निर्मात्या तन्मयी देव, फिल्मसिटीचे पंकज चव्हाण सहभागी होतील. चित्रपट समीक्षक व लेखक नम्रता फलके या सत्राच्या संवादक असतील.

शुक्रवार, दि. ३० जानेवारी २०२६ रोजी सायं. ६ वा. आयनॉक्स, प्रोझोन मॉल येथे ज्येष्ठ अभिनेते दिलीप प्रभावळकर यांच्या समवेत विशेष संवादाचे आयोजन करण्यात आले आहे. ज्येष्ठ नाट्य-सिने दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णी हे या सत्राचे संवादक असतील.

शनिवार, दि. ३१ जानेवारी २०२६ रोजी दुपारी. १२.३० वा. आयनॉक्स, प्रोझोन मॉल येथे 'चित्रपट-संहिता ते प्रदर्शन' या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये ध्वनी संयोजक पद्मश्री रसूल पुकूट्टी, संकलक आरती बजाज, दिग्दर्शक अनिरूध्द रॉय चौधरी, छायाचित्रणकार राफे मेहमूद, पटकथा लेखक उर्मी जुवेकर हे सहभागी असतील. महोत्सव संचालक सुनील सुकथनकर या चर्चेचे संवादक असतील.

शनिवार, दि. ३१ जानेवारी २०२६ रोजी सायं ६ वा. आयनॉक्स, भारतीय सिनेमा स्पर्धा गटातील चित्रपट दिग्दर्शकांसमवेत चर्चा आयोजित करण्यात आलेली आहे.

रविवार, दि. १ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी १२ वा. आयनॉक्स, प्रोझोन मॉल येथे इंडिया फोकस या चित्रपट विभागातील दिग्दर्शकांसमवेत चर्चा आयोजित करण्यात आलेली आहे.

रविवार, दि. १ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी १२ वा. आयनॉक्स, प्रोझोन मॉल येथे हिंदी सिनेमांचे प्रसिध्द निर्माते व दिग्दर्शक आनंद एल. राय यांच्या मास्टरक्लासचे आयोजन करण्यात आले आहे. प्रसिध्द चित्रपट दिग्दर्शक जयप्रद देसाई हे त्यांच्या समवेत संवाद साधतील.

स्पर्धा विभागातील सर्व प्रादेशिक चित्रपटांचे दिग्दर्शक, कलावंत आणि तंत्रज्ञ महोत्सवात उपस्थित राहणार असून त्यांच्या चित्रपटाच्या प्रदर्शनानंतर ते प्रेक्षकांशी संवाद साधणार आहेत.

महोत्सवाच्या निमित्ताने मराठवाड्यातील लघुपट निर्मिती करणाऱ्या कलाकारांसाठी शॉर्ट फिल्म स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते. या स्पर्धेला मराठवाड्यातील आठही जिल्ह्यातून मोठा प्रतिसाद लाभला. स्पर्धेतील अंतिम फेरीसाठी निवडलेल्या पाच शॉर्ट फिल्म महोत्सवादरम्यान दाखविण्यात येतील. या स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट शॉर्ट फिल्मला विशेष पारितोषिक व रोख २५,००० रूपये देऊन गौरविण्यात येणार आहे.

चित्रपट महोत्सवामध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवावा याकरिता छत्रपती संभाजीनगर शहरात पंचवीस महाविद्यालयांमध्ये चित्रपट रसग्रहण कार्यशाळांचे आयोजन चित्रपट समीक्षकांच्या उपस्थितीत दि. १३ ते २७ जानेवारी २०२६ दरम्यान करण्यात येणार आहे.

चित्रपट महोत्सवास उपस्थित राहण्याकरीता प्रतिनिधी नोंदणीची सुरूवात करण्यात आलेली असून .. या वेबसाईटवर चित्रपट रसिकांना ऑनलाईन प्रतिनिधी नोंदणी करता येईल तर प्रत्यक्ष नोंदणी आयनॉक्स प्रोझोन मॉल, विशाल ऑप्टीकल्स (उस्मानपुरा व निराला बाजार) व निर्मिक ग्रुप, व्यंकटेश मंगल कार्यालयासमोर, सुतगिरणी रोड येथे करता येईल.

छत्रपती संभाजीनगरचे नाव चित्रपट क्षेत्रात जागतिक व्यासपीठावर नेणाऱ्या या महोत्सवात मराठवाड्यातील नागरिकांनी सहभाग नोंदवावा तसेच अधिक माहितीसाठी .. या वेबसाईटवर तसेच . या ई-मेल आयडीवर संपर्क साधावा, असे आवाहन महोत्सवाचे संस्थापक व संयोजन समितीचे अध्यक्ष नंदकिशोर कागलीवाल, प्रमुख मार्गदर्शक अंकुशराव कदम, मानद अध्यक्ष आशुतोष गोवारीकर, सतीश कागलीवाल, महोत्सवाचे संचालक सुनील सुकथनकर, कार्यकारी संचालक चंद्रकांत कुलकर्णी, कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, डॉ. अपर्णा कक्कड, आकाश कागलीवाल, डॉ. आशिष गाडेकर, निमंत्रक नीलेश राऊत, महोत्सवाचे असोसिएट डायरेक्टर जयप्रद देसाई, ज्ञानेश झोटींग, डॉ. शिव कदम, डॉ. रेखा शेळके, प्रा.दासू वैद्य, डॉ. प्रेरणा दळवी, डॉ.आनंद निकाळजे, शिवशंकर फाळके, सुबोध जाधव, डॉ. कैलास अंभुरे, निखिल भालेराव, अमित पाटील, किशोर नरवडे, किशोर निकम, अजय भवलकर आदींनी केले आहे.

# डॉ. न. म. : गारवड्याचे इनामदार जोशी

**ज्योतिर्मय साहित्य**

सातारा जिल्ह्यातील वाई तालुक्यातील बावधनचे स्वातंत्र्य सैनिक डॉ. वामन नारायण कुबेर यांनी १९६० च्या दशकातील त्यांच्या पीएच.डी साठी लिहिलेला डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरील प्रबंध जगप्रसिद्ध आहे. हा संशोधनात्मक ग्रंथ संपूर्ण जगात विविध विद्यापीठांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्यावर संशोधन करणा-यांना महत्वाचा आहे. या अधिकृत ग्रंथाचा अभ्यास केल्याशिवाय संशोधकांना पुढेच जाता येत



नाही. मी यासंदर्भात लिहिलेला लेख डॉ.नरसिंह महादेव जोशी यांच्या वाचनात आला. त्यांचा ताबडतोब मला फोन आला आणि त्यांनी हा लेख आवडला तसेच त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर चरित्रात्मक पुस्तक लिहिले असल्याचे व त्यास पुरस्कारही मिळाला असल्याचे मला सांगितले. डॉ.वा.ना. कुबेर यांची कन्या संजीवनी वामन कुबेर या प्रा.न.म.जोशी यांच्या 'टिळक शिक्षण महाविद्यालय' च्या बी.एड. च्या विद्यार्थिनी होत्या. आणि डॉ. वामन कुबेर यांचे घरी ते जाऊन आल्याचेही मला त्यांनी सांगितले. मला आपणाशी गप्पा मारायच्यात यासाठी मला त्यांनी त्यांच्या घरी पुणे येथे आमंत्रीतही केले.



शिरीष चिटणीस
सातारा मो. 75888 65051

कर्मवीर भाऊराव पाटील यांचा सहवास लाभलेले डॉ.न.म. जोशी हे सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील गारवडे गावचे. १९४८ साली झालेल्या गांधीहत्येनंतर झालेल्या अग्निकांडात त्यांचे गारवड्याचं घर भस्मसात झालं. तुळ्यांचे निखारे झाले आणि होत्याचे नव्हते झाले. गारवड्याचे इनामदार जोशी असणाऱ्या डॉ.न.म. जोशी यांच्या कुटुंबाला आहे ते कपड्यानिशी गाव सोडावे लागले. तेंव्हा त्यांचे वय १२ वर्षाचे होते. त्यांचा जन्म ११ जानेवारी १९३६ चा.

'सांगे वडिलांची कीर्ती। तो एक मूर्ख । असे संत रामदास स्वामी यांनी म्हंटलय. पण वडिलांची कीर्ती सांगून मूर्खपणा पदरी बांधायला नियतीनच वाव ठेवला नाही. उलट कष्ट करून शहाणपणा शिकण्यासाठी न.म. जोशी यांना उसळत्या जनसागरात ढकलून दिलं आणि त्यातूनच चार हात मारून, गटांगळ्या खात किना-याला लागण्यासाठी त्यांना धडपड करावी लागली. सर्वच जोशी कुटुंबियांना पुढील आयुष्यात प्रचंड कष्ट करावे लागले. न.म. जोशी शिक्षण घेत घेत शिक्षक, प्राध्यापक, लेखक झाले. डॉ. न. म. जोशी हे त्यांच्या मावशीकडे राहून शिक्षण घेत होते. मावशीचे यजमान रेल्वेत नोकरीला होते. त्यांच्या वारंवार बदल्या होत असल्याने विंचवाचे बि-हाड पाठीवर या न्यायाने न.म.जोशी यांना सांगली, जळगांव, सोलापूर, पुणे अशी शिक्षणासाठी भ्रमंती करावी लागली. न. म. जोशी यांचे वडील महादेव जोशी हे एका नाटक कंपनीत व्यवस्थापकाचे काम करीत. पुढे ती नाटक कंपनी बंद पडल्यावर काम पाहण्यासाठी ते प्रथम एकटेच पुण्यात आले आणि लग्न-मुंजीत स्वयंपाकाचे काम करू लागले. **(क्रमशः)**





# जात्यावरच्या ओव्या......

गाय कपिला लाडकी
हिच वासरू सोनेरी
शेपटीचा गोंडा वर
देवाजीची कारागिरी ||४४||

गायी संग वासरू
घरादाराला संपत
बाळगोपाळ साजरे
चाले अंगतपंगत ||४५||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# समर्थांच्या घरी...

## उगवतीचे रंग



विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

ज्योतिर्मय साहित्य

पुढे समर्थांचे मोठे बंधू असलेले गंगाधरपंत यांना त्यांच्या वडिलांनी म्हणजे सूर्याजीपंतांनी अनुग्रह दिला. त्यांनी आपल्यालाही अनुग्रह द्यावा म्हणून समर्थ खूप मागे लागले. परंतु तू अजून लहान आहेस. इतक्यात गडबड करू नकोस असे वडिलांनी सांगितले. त्यामुळे समर्थ रुसून बसले आणि गावाबाहेरच असलेल्या मारुतीच्या मंदिरात जाऊन मारुतीरायाची मनधरणी करू लागले. संध्याकाळ झाली, रात्र झाली तरी तेथून ते हलले नाहीत. शेवटी तिथेच त्यांना अति श्रमामुळे झोप आली. त्यावेळी प्रत्यक्ष मारुतीरायांनी दर्शन देऊन त्यांची समजूत घातली आणि त्यांना कृपाशीर्वाद दिला. हे मारुतीचे मंदिर आजही आपल्याला जांब गावात बघायला मिळते. समर्थ ज्या ठिकाणी रुसून बसले होते आणि ज्या ठिकाणी त्यांना मारुतीरायाने दर्शन दिले ते मंदिर पाहता आल्यामुळे मला जो आनंद झाला तो शब्दातीत आहे. म्हणूनच इथली माती हे पवित्र माती आहे. कुसुमाग्रज यांच्या शब्दात थोडा बदल करून असे म्हणता येईल की

जांब गावीच्या मातीचा
लावा ललाटास टिळा
हिच्या संगतीने घडल्या
बाल समर्थांच्या लीला.



याच गावामध्ये समर्थांचे देवघर आहे म्हणजे समर्थांचे वडील ज्या मूर्तींची पूजा करीत असत त्या मूर्ती आजही आपल्याला बघायला मिळतात त्यामध्ये राम, सीता आणि लक्ष्मण यांच्या मूर्ती आहेत. तसेच समर्थांच्या वडिलांना प्रत्यक्ष सूर्यनारायणाने भेट दिलेली पंचायतन मूर्ती देखील या ठिकाणी पाहायला मिळते. अतिशय सुंदर असलेल्या या मूर्ती पाहून मन प्रसन्न होते. साधारणपणे सीतामाता रामाच्या डाव्या बाजूला उभी असते परंतु या ठिकाणी मात्र ती उजव्या बाजूला आहे. इथे ती आदीमायेच्या रूपात आहे म्हणून तिचे स्थान उजव्या बाजूला आहे असे म्हटले जाते. याच ठिकाणी समर्थकालीन वाड्याचे काही पुरातन अवशेष आपल्याला आढळतात.

येथूनच साधारणपणे तीन किलोमीटर असलेल्या आसनगाव या गावी समर्थ रामदासांचे लग्न लागले होते. त्यावेळी समर्थ केवळ बारा वर्षांचे होते परंतु लग्न लागण्यापूर्वीच सावधान शब्द कानी पडल्यानंतर ते सावधान झाले आणि त्यांनी तेथून पळ काढला. संसारातील व्यर्थपणा त्यांना कळला. आणि पुढे समाजाला सावधान करण्यासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य खर्च केले त्यांनी समाजाचा संसार केला. अशा या आसन गावी ज्या बोहल्यावर समर्थांचे लग्न लागले होते तो बोहला आजही बघायला मिळतो.

समर्थांच्या वास्तव्याने पावन झालेली अशी अनेक ठिकाणी या परिसरात आहेत. ती पाहण्याचे भाग्य लाभल्यामुळे मला खरोखरच धन्यता वाटली. समर्थांच्या कार्याविषयी ज्यांना आदर आहे, ज्यांची समर्थांप्रती श्रद्धा आहे, अशा सर्व समर्थ भक्तांनी एकदा तरी या परिसराला अवश्य भेट द्यावी इतके हे ठिकाण सुंदर आणि पावन आहे.

***




## दासबोध स्तवन





उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# चतुर्दशब्रम्हनिरूपण

ज्योतिर्मय साहित्य

सर्वब्रम्ह – विश्वरूपाने दिसणारे सर्व द्रुष्य नाशवंत आहे. ते विश्वबरोबर लय पावते वेदांत शास्त्रामध्ये या विश्वाच्या प्रलयाचीकल्पना आहे. ब्रम्ह देवाची रात्र सुरू होऊन एकदाका प्रलय मांडला म्हणजे ब्रम्हभुवनापासून तो थेट भूलोकापर्यंत्त सर्व पंचमहाभूतांचा दर्जा कमी कमी होतो. आपल्या डोळ्यांनाजे जे दिसते ते ते खरे ही सर्व खरे ही कल्पना आहे. पण या अनुभवामध्ये जेमूळ अचल स्थिर आहे त्यास चंचलता अस्थिर ता लावली जाते. जे गुणांच्या पलिकडे गुण लावले जातात ज्ञानी पुरुष आकारात असलेल्या वस्तूला शाश्वत ब्रम्ह मानत नाहीत. जे भूत आहे म्हणजे निर्माण झालेले आहे असे पंचभूतात्मक विश्व नाशवंत आहे हे प्रत्यक्ष अनुभव घेतला आहे म्हणून हे सर्व ब्रम्ह च आहे हेकसे मानय करावे. तात्पर्य काय तर सर्वब्रह नाशवंत आहे.

चैतन्यब्रम्ह – ज्या दिसणार्या विश्वाला चैतन्य जिवंत ठेवते ते विश्व खरे नाही. म्हणून खोटेपणाने भासणा–या विश्वाला चालना देणारे चैतन्य त्या विश्वाबरोबर नाश पावते असे म्हणावे लागते.

साक्षब्रम्ह – समर्थ म्हणतात साक्षित्वात पदार्थांना वेगळेपणाने पाहणे असते पण जेथे पदार्थच नाहीत तेथे साक्षित्वाला वावच उरत नाही. म्हणून साक्षब्रम्ह खरे नाही.

सगुणब्रम्ह – जे जे गुणांनी वेढलेले आहेत ते ते नाशवंत असते, असा प्रत्यक्ष अनुभव येतो. त्याला इतर प्रमाणाची गरज नाही.द्रुष्य सगळे गुणमय असते म्हणून सगुणब्रम्ह नाशवंत आहे.

निर्गुणब्रम्ह – गुणमय द्रुष्य जीवनहा शब्दांचा प्रांत आहे. जेथे गुण नाहीत तेथे शब्द पोहचू शकत नाहीत. तर ‘‘निर्गुण‘‘हा केवळ एक शब्द आहे. त्याने कोणती वस्तु दर्शवली जात नाही. गुणच नाही तर वस्तु नाही तर वर्णन कोणाचे करायचे. ज्ञानी पुरूष असे सांगतात की माया ही मिथ्या आहे. ती म्रुगजळासारखी आहे. आपण पहातो हे विश्व कल्पनेचे आहे. जे गावचं अस्तित्वात नाही त्याची हद्द कशी दाखवणार. तात्पर्य असे की जथे गुणमय द्रुष्य विश्वच म्रुगजळासारखे आहे ते अस्तित्वात नाही तेथे गुणांना ओलांडून रहाणारे निर्गुण ब्रम्ह खरे मानता येत नाही. मायेच्या पसा–यात सत्ता वावरते. पदार्थाच्या पसा–यात जाणतेपणा वावरतो अविद्येच्या पसा–यात चित्तशक्तिचा खेळ चालतो. सत्ता, साक्षित्व, चित्तशक्ति या कल्पना, माया, द्रुष्यपदार्थ आणि अज्ञान यातुन निर्माण होतात. पण या तिन्ही गोष्टी गुणांच्या कक्षेत आहेत याठिकाणी कल्पनाच कमी पडतात. सारांश काय तर जे गुणरहित परब्रम्ह ते निर्गुण या शब्दाच्या खुणेने सांगायचे इतकेच. पणतो शब्द व त्याने दर्शवलेला संकेत दोन्ही अशाश्वत आहेत असे समजावे.

(क्रमशः)

# परमेश्वराची खरी पूजा



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

देहाभिमान नाहीसा झाला म्हणजे काळजीचे कारण उरत नाही. ‘ मी साधन करतो ’ असा अभिमान देहाभिमानामुळे उत्पन्न होतो. हा साधनाभिमानही घातुक असतो. तेव्हा, जे काही होते ते परमेश्वराच्या सत्तेने होते असे मानीत जावे. आपले हित कशात असते ते त्यालाच उत्तम कळते, आणि तो सर्व तुमच्या बऱ्याकरिताच करीत असतो. तेव्हा कसलीही काळजी करू नये. त्याच्यावर विश्वास टाकून आनंदात असावे. चित्तवृत्ती परमेश्वराकडे लावावी. तेथून ती विषयाकडे जाऊ लागली म्हणजे संधी साधावी; म्हणजे त्यावर लक्ष असावे. मन विषयाकार होऊ लागले म्हणजे माझे स्मरण करावे. बऱ्याच वेळाने आठवण झाली तरी माझे स्मरण करावे, म्हणजे पुढे पुढे लवकर आठवण होऊ लागेल. ज्याचे मन पूजेत असते त्याची खरी पूजा होते. सर्वांभूतीं भगवद्भाव, आणि कोणाचे मन न दुखविणे, ही पूजा खरी होय. पूजेला बाह्योपचाराची गरज नसते. मन मात्र अर्पण होणे जरूर आहे. पूजेत भाव असणे जरूर आहे.

भक्ती आणि वैराग्य यांच्यामध्ये तसा फरक नाही. परमेश्वराची आवड म्हणजे भक्ती, आणि विषयाची अनासक्ती म्हणजे वैराग्य. रामराय वनवासात जायला निघाले तेव्हा त्यांनी सीतामाईला बरोबर न येण्याविषयी सांगितले. त्या वेळी तिने उत्तर दिले की, ‘ रामा ! तुझ्याबरोबर असेन तर मला सर्व कष्ट सुखमय आहेत; आणि तुझ्याशिवाय असेन तर सर्व सुखोपभोग हे मला कष्टमयच आहेत. ’ सीता ही रामाची मोठी भक्त होती, आणि म्हणून तिची अशी अवस्था होती. तिला परिस्थितीची जाणीव नव्हती. पण आपली गोष्ट अशी नाही. आपण एकीकडे परिस्थितीवर अवलंबून आहोत आणि दुसरीकडे आपल्याला भगवंत पाहिजे, म्हणून आपण मध्यम मार्ग धरावा; तो हा की, आपण म्हणावे, ‘ रामा, माझी परिस्थिती तुझ्या इच्छेवर अवलंबून आहे. ’ असे आपण मन:पूर्वक म्हटले की परिस्थिती बदलली तरी आपला आनंद टिकेल.

‘ माझ्या देवाला हे आवडेल का ? ’ अशा भावनेने जगात वागणे हाच सगुणोपासनेचा हेतू आहे. जसजशी आपण सगुणाची उपाधी वाढवतो तसतशी आपली इतर उपाधी कमी कमी होत जाते. सगुणाच्या उपासनेला आज आपण कल्पनेने प्रारंभ करू, मागून निश्चयात्मकता आपोआप येईल. चैतन्य सर्व ठिकाणी भरलेले आहे; ते कुठेही प्रकट होऊ शकेल. त्याला प्रकट करणे हे आपल्या भावनेवर अवलंबून आहे. ज्याची भावना खरी शुद्ध, म्हणजे नि:संशय असते, त्याला दगडाची मूर्तीदेखील देव बनते. भावना मात्र शंभर नंबरी पाहिजे; त्यामध्ये भेसळ उपयोगाची नाही.

उपाधी वासना नाहीशा करण्यासाठीच नाम घ्यायचे असते.



# श्री संत ज्ञानेश्वर
## अभंग व अर्थ

### अभंग ९

नीळवर्ण रज । नीळवर्ण बुझे ।
निळिमा सहजे । आकारली ॥१॥
नीळ प्रभा दिसे । नीळपणें वसे ll
निळिये आकाश । हरपलें ॥ध्रु०॥
निळेपण ठेलें । निळिये गोंविलें ।
निळपण सोंविळें । आम्हां जालें ॥२॥
ज्ञानदेवी निळा । परब्रह्मीं गोविला ।
कृष्णमूर्ति सांवळा । हृदयीं वसे ॥३॥

अर्थ:-

त्या घननिळ्याच्या पायीच्या धुळी मनालाही निळेपण लाभले आहे. व ती सहज मनात आकारली. त्याचा निळा रंग असल्याने त्याची निलप्रभा पसरली आहे. व त्यात आकाश हारपले आहे. त्या देवाच्या निलवर्णामुळे भक्त ही निळेपणात न्हाले व त्यामुळे ते पवित्र झाले. मी त्याला परब्रह्मात ही निळेपणे पाहिला व ती कृष्णमूर्ती सावळेपणेच हृदयात वसली असे माऊली सांगतात.

### अभंग १०

निळिये पेरणी । निळिये वाह्यणी ।
गुणाचीं लेणीं । कृष्णवर्ण ॥१॥
नवलाव गे माय । नवलाव चोज ।
निळीं निळिमा काज । आकारलें ॥ध्रु०॥
नीळवर्ण तनु । नीळवर्ण गुणू ।
निळिमा पूर्ण । हृदयीं नांदे ॥२॥
ज्ञानदेवीं लीला । मननीं निवाला ।
निळिये अवलीळा । हरपला ॥३॥

अर्थ:-

त्या हृदयात निळेपणाचा परमात्मरुपी बीज घातल्यावर निळवर्णाची खाणच मिळाली. त्या निलवर्णाने सर्व गुण निळेच झाले आहेत. आश्चर्य आहे की माया ही निळीच आहे. व सर्व जगच निळे दिसत आहे. त्याचे शरिर निळे त्याचे गुण निळे संपुर्ण हृदयी निळेपणे आले आहे. त्याच्या निळवर्ण लीलेने मन उन्मन झाले व मी त्यात लीन झालो. असे माऊली सांगतात



## आरोग्य संजीवनी

# कोथिंबीर, कांदा, लसूण यांचे आरोग्यासाठी मोठे फायदे !!

ज्योतिर्मय साहित्य

लसूण, कांदा, कोथिंबीर हे बहुतेक कुटुंबाच्या खाण्यात नेहमीच असते. सुदृढ आरोग्यासाठी त्या तिन्ही पदार्थांचे मोठे फायदे आहेत. पण, अतिसेवन केल्यास त्याचे तोटे देखील होऊ शकतात.

हृदयविकार, न्यूमोनिया, मुतखडा, अशक्तपणा, उच्च रक्तदाब, श्वसनाचे विकार, मधुमेह, क्षयरोग अशा विविध आजारांवर तिन्ही पदार्थ निश्चितच लाभदायक आहेत.

कोथिंबीर :

१. पचनशक्ती वाढते –

कोथिंबीर पोटाच्या समस्या दूर करून पचनशक्ती वाढवते. ताज्या कोथिंबीरच्या पानांना ताकासोबत प्यायल्याने अपचन, मळमळीच्या समस्यांपासून आराम मिळतो. कोथिंबीर, हिरवी मिरची, नारळ आणि अदरकची चटणी बनवून खाल्ल्याने, अपचनामुळे पोटात होणाऱ्या वेदनांपासून आराम मिळतो. तसेच अर्ध्या ग्लास पाण्यात दोन चमचे कोथिंबीर टाकून प्यायल्याने देखील पोटदुखीपासून आराम मिळतो.

२. अशक्तपणा होईल दूर –

जर तुम्हाला खूप थकल्यासारखे, अशक्त वाटत असेल किंवा चक्कर येत असतील. तर दोन चमचे कोथिंबीरीच्या रसामध्ये दहा ग्राम मिश्री (खडीसाखर) आणि अर्धी वाटी पाणी मिसळून सकाळ– संध्याकाळ प्यायल्याने थकवा, अशक्तपणा कमी होतो.

३. श्वासाचे रोग होतील दूर –

कोथिंबीर श्वासासंबंधी रोगांना दूर करण्यासाठी खूप फायदेशीर असते. खोकला, दमा किंवा श्वास घेण्यास त्रास होत असल्यास कोथिंबीर आणि मिश्री (खडीसाखर) समान प्रमाणात मिळवून बारीक करा. हे मिश्रण एक चमचा भाताच्या पाण्यात मिळवून रोग्याला पाजा. काही दिवस नियमीत असे केल्याने आराम मिळेल.

४. मुतखडा, दृष्टी सुधारते –

कोथिंबीर रक्तातील इन्सुलिनचे प्रमाण नियंत्रित करते. कोथिंबिरीचे सेवन मूत्रपिंडासाठी देखील खूप फायदेशीर आहे. मूत्रपिंडातील दगड अर्थात मुतखड्याच्या समस्या असलेल्यांनी कोथिंबीर पाण्यात उकळून सकाळी रिकाम्या पोटी प्या. हळूहळू मूत्रमार्गाने मुतखडा बाहेर निघून जातो. हिरवी कोथिंबीर शरीरातील वाईट कोलेस्ट्रॉल कमी होऊन चांगले कोलेस्ट्रॉल वाढवते. दृष्टी कमकुवत असलेल्यांनी निश्चितपणे कोथिंबिरीचे सेवन करावे. हिरव्या कोथिंबीरमध्येही गाजराप्रमाणे व्हिटामिन ए भरपूर असल्याने त्याचा डोळ्यांसाठी खूप फायदा होतो.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

कांदा :

१. रोग प्रतिकारकशक्ती वाढते –

कांदा शरीरात रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्याचे काम करतो. यामध्ये फॉस्फरस, मॅग्नेशियम, पोटॅशियम आणि व्हिटॅमिन–सी असे अनेक गुण असतात, जे शरीराला निरोगी बनवण्यास तसेच इम्युनिटी वाढविण्यास मदत करतात. पचनाच्या समस्यांवर कांद्याचे सेवन फायदेशीर ठरू शकते. पचनक्रिया मजबूत करण्यासाठी आणि पोट निरोगी ठेवण्यासाठी तुम्ही कांदा सलादच्या स्वरूपात खाऊ शकता.

२. कॅन्सरपासून होईल बचाव –

कांद्यामध्ये अँटी कॅन्सर गुण देखील असतात. ते शरीरात कर्करोगाच्या पेशी वाढण्यापासून रोखत नाहीत तर त्यांचा नाशही करतात. अनेक अभ्यासांमध्ये असा दावा करण्यात आला आहे की, जे कांदा खातात त्यांना कॅन्सरसारख्या गंभीर आजाराचा धोका कमी असतो.

(क्रमशः)

# लघु बोधकथा



### गुरु केले कासवाला

कोणे एके काळी एका नगरात एक वृद्ध एकटाच राहत होता. छोट्याशा झोपडीत राहून तो आजूबाजूच्या शेतात छोटीमोठी कामे करून स्वत:ची गुजराण करत असे. आपल्या गरजा त्याने खूपच मर्यादित ठेवल्या असल्याने त्याला फारसा खर्च येत नसे. मात्र हे असताना त्याने एक कासव पाळले होते आणि त्या कासवावर त्याचा फार जीव होता. दुपारी आपले जेवण तयार करताना तो कासवासाठी हरभरे भिजवून त्याला देत असे. रिकामा वेळ असताना तो त्या कासवाशी संवाद साधत असे. आजूबाजूचे लोक त्याचे ते कासवप्रेम पाहून हसत असत. एके दिवशी एक परिचित मनुष्य त्याला भेटण्यासाठी आला. थोडा वेळ इकडचे तिकडचे बोलून झाल्यावर त्याने त्या कासवाला पाहिले व तो मनुष्य म्हणाला," तू इतका घाणेरडा प्राणी कशासाठी पाळला आहेस. सोडून दे त्या कासवाला." त्याच्या बोलण्याने वृद्धाला खूप वाईट वाटले. वृद्ध म्हणाला,"अरे मित्रा, तू असे बोलून माझ्या काळजाला हात घातला आहेस. इतके वाईट तर मी कधीच त्या कासवाबद्दल माझ्या मनात किंवा स्वप्नातसुद्धा विचारत आणत नाही. ते कासव माझ्या गुरुस्थानी आहे म्हणून माझ्या मनात त्याच्याबद्दल खूप आदर आहे." तो माणूस म्हणाला,"ते कासव तुझे गुरु कसे काय बरे ठरते" वृद्ध म्हणाला," कासव हे मानवी मनाचे प्रतिक आहे. कासव आपल्याला हे शिकवते की त्याच्यावर जरा जरी संकटाची चाहूल लागली तरी ते जसे स्वत:चे अंग आक्रसून कवचाखाली जाते त्याप्रमाणेच मानवाने वाईट गोष्टींची जराशी चाहूल जरी लागली तरी त्यापासून लांब राहिले पाहिजे. कासवाप्रमाणे आपण आपल्या मनाला वाईट गोष्टींपासून अंग चोरण्याचा प्रयत्न केला तर मानवाचे त्यात भले आहे."

# नातं (भाग ३)

ज्योतिर्मय साहित्य

आनंद ने विचार करतच दाराच्या आतून असलेल्या डोअर होल मधून बाहेर बघितले तर त्याचा मेहुणा, मधुराचा भाऊ मकरंद आला होता.

आनंद विचार करत असतानाच मकरंदने पुन्हा बेल वाजवली आणि आनंद भावजी असा आवाज ही दिला.

आनंदने दरवाजा उघडला. रात्रीचे साडे दहा वाजत आले होते.

अरे मकरंद, या वेळेस अगदी अचानक, कसा काय येणे केलेस? ये ये आत ये.

मकरंद आत येत म्हणाला,काय भावजी ? मधुरा ताईचा बर्थ डे एकटाच करता की काय?

मला ताई एकदा म्हणाली होती की मी आणि तुझ्या भावजींनी एकमेकांना वचन दिली आहेत, जो/जी आधी जाईल, त्याचा/तिचा बर्थ डे आठवण म्हणून दुसऱ्याने तो/ती असेपर्यंत साजरा करावयाचा. म्हणून मी आलोय, ताईच्या बर्थ डे साठी.

इतक्यात आत डायनिंग टेबल जवळ असलेल्या खुर्चीवर अर्चनाला जोरात शिंक आली आणि मकरंद एकदम दचकला.

तो म्हणाला, भावजी किचन मध्ये, कोण आहे?

तेंव्हा आनंद म्हणाला,अरे घाबरू नकोस, तुझ्याच ताईची मैत्रीण अर्चना आली आहे, तुझ्या सारखी ताईचा बर्थ डे

करण्यासाठी. तेंव्हा मकरंद म्हणाला, त्या किचन मध्ये काय करत आहेत? इकडे बाहेर हॉल मध्ये बसल्या का नाहीत?

आणि मकरंदच्या मनात नको नको ते प्रश्न उद्भवू लागले. तेंव्हा आनंद म्हणाला, अरे मकरंद, अर्चना येऊन एक दीड तास झाला आहे.

मी म्हणालो,आता आलीच आहेस तर जेवण



करून जा, तुझ्या स्वर्गीय मैत्रिणीला ही आवडेल. आणि खूप आग्रह केल्यावर आम्ही डायनिंग टेबल कडे गेलो. घास घेतलाच होता की तू आलास.

आता ये तू ही हातपाय धुवून ये आणि बस आमच्या सोबत

जेवण करायला.

तेंव्हा मकरंद म्हणाला, नको भावजी, मी आताच मित्राकडून जेवण करून आलोय, तुम्ही दोघे जेवा निवांत

असे म्हणत त्याने अर्चनाकडे नजर टाकली. अर्चनाला एक क्षण थोडेसे कसे तरी वाटले ,पण स्वतःला सावरुन ती मकरंदला म्हणाली,अरे मकरंद तुझी बहीण आणि मी मैत्रिणी.

तुझी बहीण आणि माझे पती अंकुश एकाच कंपनी मध्ये कामाला होते, आणि झालेल्या दुदैवी बस अपघातात दोघेही दगावले असे म्हणत अर्चनाचे डोळे पुन्हा पाणावले.

तेंव्हा मकरंद म्हणाला, ताई नियतीपुढे कुणाचे काही चालते का कधी?

ज्या गोष्टी आपल्या हातात नसतात , त्यावर माझ्या सारख्याने काय मत व्यक्त करावे? ताई काळ हेच यावर उत्तम औषध आहे.

बघा ना, माझ्या आनंद भावजीना ते ही तुमच्या सारखेच दुःख आहे ना ,मनात? त्यांच्याही मनात

प्रचंड वेदना आहेत,पण.पुरुषांना कुणा समोर रडता येतं नाहीं,असे म्हणताच आनंदच्या डोळ्यात ही पाणी आले.

तेंव्हा मकरंद म्हणाला,

भावजी तुमच्या डोळ्यात पाणी? अहो ,तुमचे नाव आनंद आहे.तुम्ही हळूहळू दुःख विसरून कामाला लागला

आहात. आता नका आणू डोळ्यात पाणी.

मलाही माझी बहीण जाण्याचे दुःख आहे मात्र तुम्ही आणि अर्चना ताई समदुःखी आहात. तुमचे जोडीदार गेले आहेत,याचं प्रचंड दुःख असतं, हे मला कसे कळणार?

मी एकटा जीव सदाशिव, आहे ना.

मात्र तुम्ही जास्त वेळ न घालवता जेवण करून घ्या, तोवर मी ताईच्या फोटोला नमस्कार करून हॅपी बर्थ डे,म्हणून थोडासा केक घेतो.

ओके म्हणत आनंद आणि अर्चनाने जेवण करून घेतले तोवर मकरंद केक खाऊन बातम्या पहात बसला होता.

नंतर तिघेही गप्पा मारत बसले, तेंव्हा मकरंद म्हणाला,अर्चना ताई बारा वाजत आले.आहेत,मी आता माझ्या घरी निघालो आहे,तुम्हाला कारने तुमच्या घरी ड्रॉप करू का?

तेंव्हा अर्चना म्हणाली, नको नको, मी माझी स्कुटी आणली आहे,माझे घर येथून एक



गिरीश खं. वसेकर, पुणे
94226 59400

फक्त किलोमीटरवर आहे आणि येथे रस्त्यात सिक्युरिटी गार्ड असतात,कशाचीच काही भीती नाही.

मी निघतेच आहे. ओके, मग ठीक आहे भावजी, मी निवांत रविवारी येईल असे म्हणत मकरंद परत निघाला.

मकरंदने कार काढली आणि क्षणार्धात ती दिसेनासी झाली.

इतक्यात जवळच बाहेर कुठे तरी एम एस ई बी

डी पी चा स्फोट झाला आणि त्या परिसरातील पूर्ण लाईट गेली. सर्वत्र अंधार झाला.

तेंव्हा आनंद, अर्चनाला म्हणाला,अर्चना थांब सर्वत्र अंधार आहे, आताच जाऊ

नको, मी तुला माझ्या कारने सोडले असते पण मला रात्री कारच्या लाईट मध्ये कमी दिसते. थोडे थांब, लाईट येऊ दे मग जा,

ठीक आहे असे म्हणत अर्चना म्हणाली,एम एस ई बी मधील व्यक्तीला फोन करून विचारा तुम्ही, लाईट येण्यास किती वेळ लागेल?

ओके म्हणत आनंदने तिकडे फोन लावण्याचा प्रयत्न केला पण तिकडे कुणी फोन उचलला नाही. तोवर आनंदने आपल्या सोसायटीचा व्हॉट्स अप समूह पाहिला,त्यात कुणीतरी एम एस ई बी कडून आलेला मेसेज पोस्ट केला होता की, मेजर प्रॉब्लेम आला आहे, लाईट येण्यास तीन ते चार तास लागतील.

हे आनंदने अर्चनाला सांगितले, तेंव्हा ती म्हणाली, बाप रे,आता काय करायचे?

( क्रमशः)

# तैवान प्रश्नावर ध्रुवीकरण अटळ

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

आपला निर्णय घेण्यासाठी तैवानची जनता समर्थ आहे. स्वावलंबी आहे उगाच चिनी साम्यवादी नेत्यांनी खोटा कळवळा आणू नये आणि तैवांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी उगाचच आग पाखर करण्याची गरज नाही. तैवानचे जनता सुखी आहे, समाधानी आहे. आणि तिच्यावर कोणत्याही प्रकारे लाल चीनचे कवच असणे तिला पटणारे आणि मानवणारे नाही तैवान हा मूळ चिंचाच भाग आहे व त्याचे एकत्रीकरण ही एक ऐतिहासिक अपरिहार्यता आहे. असे ही जिनपिंग यांना वाटते दोन्ही चीन एकत्र आल्यास चीन अधिक बलशाली होईल आणि त्याची ताकद वाढेल असाही युक्तिवाद चिनी नेते करतात, चीनची भूमिका ताठर आणि तेवढीच आग्रही आहे जर गरज पडल्यास आम्ही बळजबरीने पुनश्च एकीकरण करू असा चिनी नेत्यांचा दावा आहे आणि अलीकडेच ही वचनबद्धता प्रकट करण्यासाठी त्यांनी अधिक कट्टर भूमिका घेतली आहे तैवान मधील स्वातंत्र्यसमर्थकांना मृत्युदंडाची शिक्षा देण्यात येईल असे कायदेशीर मार्गदर्शक तत्त्व ही जारी केले आहे. पण लाल चीनचा हा फतवा तैवान मधील स्वातंत्र्यप्रेमी लोकांनी खुंटीला लटकवला आहे. चीन तैवानवर राजकीय दबाव आणत आहे आणि तैवान समर्थकांना भीती दाखवून त्यांना ताब्यात घेण्याचा प्रयत्न करत आहे. जानेवारी २०२६ पर्यंत तैवानची १२ घटक राज्य ज्यांना खोलीसी सेव म्हटले जाते ती बळकावण्याचा चीनचा डाव आहे नव्या वर्षाच्या पहिल्या दोन-तीन महिन्यात चीन काहीतरी आक्रमक अकस्मात लष्करी कारवाई करण्याचा धोका संभवतो आहे, परंतु तैवानचे खंबीर नेतृत्व चीनला प्रतिशह देण्यासाठी समर्थ आहे.

लोकशाही राष्ट्रांची भूमिका

अमेरिका, जपान आणि जगातील इतर लोकशाही राष्ट्रांची तैवान




प्रश्नावरील भूमिका लक्षात घेण्यासारखी आहे विशेषतः डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाने २०२६ मध्ये अलीकडेच तैवानसाठी ११.१ अब्ज डॉलर्सच्या किमतीची शस्त्रास्त्रे स्वतंत्र पॅकेज म्हणून तैवानला देण्यासाठीच्या योजना आकार दिला आहे. आणि तशा अमेरिकन काँग्रेसला सूचनेही दिल्या आहेत. त्यामध्ये प्रगत रॉकेट लॉन्चर आणि लांब पल्ल्यांच्या क्षेपणास्त्रांचा समावेश आहे, अमेरिकेची ही कृती हे स्पष्ट करते की चीनचे तैवान वरील आक्रमण अमेरिकेला मान्य नाही. जरी एका काळी अमेरिका चीनच्या वन चायना धोरणाला पाठिंबा देत होता तरी आज ट्रम्प प्रशासन मात्र तीला कोंडीत पकडण्यासाठी पुढे सरसावले आहे उगवत्या सूर्याचा देश जपान आता नव्याने जागा झाला आहे. आणि जपान स्वतःचा अण्वस्त्र कार्यक्रम सुरू करत आहे. त्यांनी पूर्वीचे सिटी म्हणजे संयुक्त अणु वस्त्र बंदी कराराचे धोरण आता खुंटीला टांगले आहे. जपानच्या नव्या नेत्या सानेतकाची या महत्त्वाकांक्षी आणि तेवढ्याच मुच्छद्दी आहेत. त्याने तैवानच्या सुरक्षेसाठी स्वतःच्या सुरक्षेशी जोडण्याचे ठरविले आहे. भविष्यात वाढत्या प्रमाणात तणाव वाढला तर जपान स्वस्त राहणार नाही तैवान वरील हल्ला हा जपानला जगण्यासाठी धोकादायक परिस्थिती निर्माण करणारा असेल, हे लक्षात घेऊन त्यांनी जपान कायदेशीररित्या लष्करी प्रतिसादास तयार असेल आणि जपानला त्यामुळे तशी परवानगी लाभेल असे त्यांचे तर्कशास्त्र आहे त्यामुळे जपानला प्रतिशह देण्याचा चीनचा डाव त्याच्या अंगावर उलटण्याची शक्यता आहे.

(क्रमशः)

# युवकांचे प्रेरणास्त्रोत : स्वामी विवेकानंद

ज्योतिर्मय साहित्य



कन्याकुमारीजवळच्या समुद्रात असलेल्या एका शिलाखंडावर ध्यानमग्न अवस्थेत बसलेले असताना समाजाला जाग आणण्याचा संकल्प विवेकानंदांनी केला. त्यानंतर अमेरिकेत जाऊन शिकागो येथे भरलेल्या सर्वधर्मपरिषदेस हिंदू धर्माचे प्रतिनिधी म्हणून ते उपस्थित राहिले. ११ सप्टेंबर १८९३ या दिवशी त्यांनी केलेल्या पाच मिनिटांच्या पहिल्या भाषणाने सारी सभा मंत्रमुग्ध झाली आणि सतरा दिवस चाललेल्या त्या परिषदेवर सर्वांत अधिक प्रभाव त्यांचा पडला.

स्वामी विवेकानंदांना युवाशक्ती वर खूप मोठा विश्वास होता आणि तो त्यांनी आपल्या अनेक भाषणातून व्यक्तही केला होता. युवकांमध्ये सकारात्मक ऊर्जा जागृत करून तिचा उपयोग केला तर युवक निश्चितच त्यांच्या ध्येयापर्यंत पोहोचू शकतात हा विश्वास स्वामी विवेकानंदांना होता.

स्वामी विवेकानंद हे केवळ भारतातच नव्हे तर जगभरात त्यांच्या आदर्श आणि विचारांसाठी ओळखले जातात. अगदी लहान वयातच त्यांनी आपल्या विचारांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली होती. त्यांचे विचार तरुणांना प्रेरणा देण्याचे काम करतात .

तरुण हा देशाचा महत्त्वाचा भाग आहे, जो देशाला पुढे नेण्यात महत्त्वाची भूमिका बजावत असतो.

विवेकानंदांनी युवाकांन विषयी जो विश्वास व्यक्त केला होता तो सार्थ ठरावा त्यादृष्टीनेच त्यांच्या विचारांचा भारतीय तरुणांमध्ये प्रचार व प्रसार व्हावा आणि त्यांच्या सकारात्मक ऊर्जेला जागृत करून एक चांगला देश, सामर्थ्यशाली देश बनावा ही त्या मागची भावना. म्हणूनच स्वामी विवेकानंदांची जयंती (१२ जानेवारी १८६३) १२ जानेवारी हा दिवस राष्ट्रीय युवा दिवस म्हणून साजरा केला जातो.

आजही आपला भारत देश युवकांचा देश म्हणून ओळखला जातो. भारतात युवकांची संख्या बघितली तर ती जवळपास ६५ टक्के पर्यंत आहे. आणि म्हणूनच युवापिढीच्या क्षमता आणि ताकदीवर आपला देश जागतिक महासत्ता




भरण्याचे स्वप्न पाहत आहे. देशाच्या विकासात युवकांचा मोठा सहभाग अपेक्षित आहे. मग तो देश कार्यात असेल, सामाजिक सुधारणात असेल, शेतीच्या प्रगतीत असेल, शैक्षणिक विषयात असेल, औद्योगिक क्षेत्रात असेल पण तो आवश्यक आहे, आणि त्यादृष्टीने खूप मोठे प्रयत्न आवश्यक आहेत. नुसताच युवकांचा मोठा देश म्हणून बिरुदावली मिरवून चालणार नाही, तर त्या युवाशक्तीला सर्व क्षेत्रात चांगल वळण विधायक वळण देणे तितकेच आवश्यक आहे. आज देशाच्या सीमेवर लढणारा हा युवकच आहे.

(क्रमशः)






# तिरुपती बालाजी

ज्योतिर्मय साहित्य

आख्यायिका

भगवान विष्णूंचे प्रकटीकरण

एकदा ऋषीमुनी मध्ये अशी चर्चा रंगली की, आपण यज्ञात आहुती देतो, ती देवता ग्रहण करतात. पण हाच यज्ञ जर मानवा ऐवजी देवतांनी केला तर त्या यज्ञाचा हवीर्भाग कोण ग्रहण करील? देवतांमध्ये सर्वात प्रमुख देवता आणि श्रेष्ठ देवता म्हणून श्री ब्रह्मा, श्रीविष्णु व श्री महेश यांचेच नाव घेतल्या जाते. पण या तीनही मधून श्रेष्ठ कोण? ज्याला या यज्ञाचा हवीर्भाग स्वीकारता येईल. हे कसे ठरवायचे? यावर ऋषी मुनी मध्ये चर्चा झाली, आणि हे ठरवण्याचा अधिकार श्रेष्ठ ऋषी भृगू यांना देण्यात आला. भृगु ऋषी या तीन देवतांमध्ये श्रेष्ठ कोण? हे ठरवण्यासाठी बाहेर पडले. सर्वप्रथम ते आपले पिता श्री ब्रह्मदेव यांचे कडे गेले. ब्रह्मदेव समाधीस्थ होते. भृगु ऋषींच्या अचानक प्रवेश करण्याने त्यांची समाधी भंग पावली व विनापरवानगी आपला पुत्र येथे आला म्हणून ते त्यांचेवर रागावले. भृगु ऋषींना असे वाटत होते की, मी तर या तीनही देवतांची परीक्षा घेणारा परीक्षक म्हणून आलो आहे. आणि मला सन्मान न देता उलट मलाच असे झिडकारून टाकले? ब्रम्हदेव रजोगुणी दिसतात.हे माझा अपमान करण्यासारखे आहे. म्हणून त्यांनी ब्रह्मदेवाला शाप दिला की, पृथ्वी तळावर तुमची कोठेही पूजा होणार नाही. तेथून भृगु ऋषी महादेवांच्या कैलासात गेले. कैलासावर महादेव एकांतात आपली पत्नी पार्वती मातेशी गहन विषयावर चर्चा करत होते. आगंतूक पणे आलेल्या भृगु ऋषींना त्यांनी सन्मान दिला नाही. म्हणून भृगूऋषींनी त्यांनाही असा शाप दिला की, तुमची केवळ लिंग रूपातच पूजा केली जाईल. संपूर्ण स्वरूपाची पूजा केली जाणार नाही. यानंतर भृगुऋषी क्षीर सागरात शेषावर पहुडलेल्या भगवान श्री नारायणांकडे गेले. भगवान विष्णू योग निद्रेत होते व त्यांच्या चरणांजवळ लक्ष्मी माता त्यांचे पाय हलकेच दाबीत बसल्या होत्या.भृगुऋषींचे स्वागत झाले नाही म्हणून त्यांना राग आला व त्यांनी रागाच्या भरात योग निद्रेत असलेल्या नारायणाच्या छातीवर लाथ मारली. त्यामुळे भगवान समाधी भंग होऊन जागृत झाले. त्यांनी पाहिले की भृगुऋषी आले आहेत. आपण ज्यांचा आदर सत्कार केला नाही म्हणून भृगऋषी रागावले आहेत.

भगवान त्यांना म्हणाले ऋषीवर माझा देह खूप कठीण आहे व तपश्चरण करून आपले शरीर कृश झाले आहे. तेव्हा लाथ मारल्यामुळे आपल्या चरणांना काही दुखापत तर झाली नाही ना? मला क्षमा करा! भगवंताच्या इतक्या विनम्रतेणे उत्तर दिल्यामुळे भृगू ऋषी त्यांच्यावर संतुष्ट झाले. पण भगवंताच्या चरणांपाशी बसलेली लक्ष्मी माता मात्र आपल्या पतीचा झालेला अपमान सहन न होऊन भृगूऋषीं वर कृद्ध झाली. आपल्या पतीने या ऋषी ना शिक्षा न देता उलट त्यांचीच क्षमा मागितली हे पाहून ती भगवंतावर नाराज झाली व तिने वैकुंठ लोक सोडून पृथ्वीवर आगमन केले.

(क्रमशः)




चार पिढ्यांची गुंतवणूक

एक म्युच्युअल फंड डिस्ट्रीब्युटर म्हणुन मला जे थोडे फार लोक ओळखतात, त्यांच्या पैकी कुणी कुठेही भेट झाली की एक कॉमन प्रश्न विचारतात....."काय म्हणतंय तुमचं शेअर मार्केट?"
हा प्रश्न खरं तर इनव्हेस्टमेंट ॲडवाइस म्हणुन नसतो...पण बरेचदा चाचपणी करण्यासाठी मात्र नक्की असतो.
कुणी स्वतःच इनव्हेस्टमेंट केलेली असते किंवा कुणाच्या मुलांनी किंवा नातेवाईकांनी.... त्यांनी जे काही केलंय ते खरोखरच फायद्याचे आहे की नाही याची चाचपणी.
अशा प्रश्नांची उत्तरे आम्हाला नेहमीच द्यावी लागतात....पण मी एका आजोबांनी असा प्रश्न केल्यावर थोडं वैतागून त्यांना प्रती प्रश्न केला, "तुम्ही आता वयाच्या पंचाशीव्या वर्षी इनव्हेस्टमेंट करणार आहात का "तेव्हा मला त्यांनी पुन्हा प्रश्न विचारुन उत्तर देत विचारले की "तुम्हाला काय वाटतं
मी पण म्युच्युअल फंडात इनव्हेस्टमेंट करावी?"
तेव्हा माझ्या मधला सल्लागार जागा झाला आणि म्हणाला "करावी की, काय हरकत आहे?"....
तेव्हा ते म्हणाले "अहो तुम्हीच म्हणता ना की ही लाँग टर्म इनव्हेस्टमेंट आहे म्हणून?" .....मी म्हणालो हो बरोबरच आहे ते, पण असं बघा आजोबा तुमच्या आणि मुलाच्या,तुमच्या नातवाच्या, आणि तुमचा पण तु असल्यास त्याच्याही उरलेल्या आयुष्याची बेरीज बेरीज केली तर इनव्हेस्टमेंट च्या कंपाऊंडींग साठी खूप वर्षांची टर्म तयार होइल आणि मग तुमच्या पणतुलाही पुरेल अशी प्रचंड मोठी इनव्हेस्टमेंट होऊ शकते....." आणि हो हे खरं आहे ...
तुम्ही केलात का असा विचार कधी.... नाही?
मग आजचं करा आणि आपल्या पुढच्या पिढीलाही आर्थिक समृद्धी कडे न्या.









# दवाखाना

## मलेरिया (३)

**ज्योतिर्मय साहित्य**

नमस्कार मैत्रांनो!

वैद्यकीय तपासणीनुसार मलेरियाचे सौम्य (गुंतागुंत नसलेला) आणि तीव्र (गुंतागुंत असलेला) अशा दोन प्रकारात वर्गीकरण करण्यात येते.

सौम्य (गुंतागुंत नसलेला) मलेरिया: हा प्रकार बहुदा व्हायव्हॅक्स प्रजातींमुळे होतो. योग्य औषधोपचारांनी तो आटोक्यात येऊ शकतो. या रोगाची लक्षणे साधारणपणे ६ ते ८ तास आढळून येतात. इलाज न झाल्यास त्यांचीच दर दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशी पुनरावृत्ती होते. मुख्य लक्षणे सामान्य तापासारखीच असतात. मात्र परजीवींच्या रक्तपेशींवरील आक्रमणाच्या तीव्रतेनुसार थंडी वाजून तीव्र ताप येतो. हिवतापाची ही हुडहुडी (अगदी भर उन्हाळा असेल तरीही) पांघरुणांमुळे थोडी आटोक्यात येते. पॅरासिटामोलसारख्या तापशामक औषधाला हा हिवताप फारशी दाद देत नाही. तेथे पाहिजे जातीचे, अर्थात विशिष्ट मलेरिया विरोधी औषधे! मंडळी, थंडी वाजून ताप येणे ही लक्षणे फ्लूसारख्या विषाणूजनित संसर्गाने पीडित कांही रुग्णात देखील आढळून येतात. मात्र जिथे मलेरियाचा प्रादुर्भाव अतिशय जास्त आहे, अर्थात जिथे डासांचे साम्राज्य आहे, तिथे हे लक्षण महत्वपूर्ण आहे. यासोबतच डोकेदुखी आणि उलट्या यांचा देखील त्रास होऊ शकतो.




मलेरियात प्लीहा (स्प्लीन) सुजते कारण प्लीहा प्लाझमोडियम-संक्रमित लाल रक्तपेशी आणि त्यांच्या बाहेर मुक्तपणे वावरणारे परजीवी काढून टाकते, सहाजिकच तिच्यावर कामाचा भार वाढतो. या शिवाय वारंवार होणाऱ्या परजीवींच्या संसर्गामुळे शरीरात तीव्र रोगप्रतिकारक प्रतिक्रिया निर्माण होतात, ज्यामुळे प्लीहाच्या आतील भागात लिम्फोसाइट आणि मॅक्रोफेज या खास रोगप्रतिकारक कोशिका जमा होतात. त्यामुळे प्लीहाचा आकार वाढतो. तापाच्या ऐन भरात रक्ताची चाचणी देखील अतिशय मोलाची माहिती देते. एक गोष्ट फिरफिरून सांगावीशी वाटते. रक्तक्षय हे लक्षण भारतीयांच्या, खास करून येथील स्त्रियांच्या बाबतीत इतके सामान्य आहे की, त्यात मलेरियात होणाऱ्या रक्तपेशींची सरेआम कत्तल चांगलीच भर घालते. मंडळी रक्तक्षयाचे प्रमाण कमी होण्यासाठी संतुलित आहाराची आवश्यकता मी वेळोवेळी अधोरेखित केली आहे.

मलेरिया दुर्मिळ असलेल्या भागांत मलेरियाला फ्लू असे चुकीचे निदान केले जाऊ शकते. प्रचंड प्रमाणात असलेला ताप उतरतांना खूप घाम येतो, त्यामुळे आधीच तापाने अशक्तता आलेली असतांना आणखीनच थकवा येतो. ताप असतांना कांही खाण्याची इच्छा नसते, त्यामुळे हा थकवा वाढतो. या कारणांनी आणि वर उलट्या झाल्याने शरीरातील क्षार (सोडियम, पोटॅशियम इ.) आणि पाणी हे घटक कमी होतात. रुग्णाला तीव्र डोकेदुखी, कंबरदुखी आणि स्नायूंमध्ये वेदना जाणवतात. गर्भावस्थेत मलेरिया झाल्यास गर्भ देखील संक्रमित होण्याची पूर्ण शक्यता असते.

या प्रकारात शीघ्र निदान आणि औषधयोजना महत्वाची आहे. आफ्रिकेसारख्या प्रदेशांमध्ये मलेरिया खूप सामान्य आहे, आणि तेथील अनेक व्यक्तींना लक्षणे माहीत असतात, त्यामुळे सामान्य मलेरियाची लक्षणे दिसताच ते डॉक्टरांना न भेटता स्वतःहून मलेरियावर उपचार करतात. या व्यतिरिक्त तिथे जागतिक आरोग्य संघटनेने घालून दिलेल्या नियमावलीनुसार सरकारी योजनांद्वारे जनतेचे प्रशिक्षण आणि मलेरिया-विरोधी औषधांच्या किट देखील पुरवण्यात येतात. आपल्या देशात देखील मलेरियाचे अधिक प्रमाण असलेल्या भागांत अशाच प्रकारे काळजी घेतल्या जाते.


लेखिका
डॉक्टर मीना श्रीवास्तव

तीव्र (गुंतागुंत असलेला) मलेरिया: हा बहुदा फॅल्सीपेरम परजीवींमुळे होतो. वर अधोरेखित केलेली मलेरियाची लक्षणे तीव्र असतात, याशिवाय डोकेदुखी, श्वसनाचा त्रास, उलट्या, अतिसार, कावीळ, अतिजलद हृदयगती, अत्यधिक अशक्तपणा, सांधेदुखी इत्यादी लक्षणे दिसतात. कमी प्रमाणात काळसर लघवी होणे हे मूत्रपिंड बाधित होण्याचे लक्षण आहे. वेळीच उपचार न केल्याने अति-तीव्र मलेरिया होतो. त्यात शरीरातील साखर आणि क्षार कमी होतात, रुग्णाला तीव्र डोकेदुखी आणि स्नायूंमध्ये अत्यधिक वेदना जाणवतात. शेवटी चित्तभ्रम (डेलिरियम) होतो, आकडी येते आणि शुद्ध हरपते. मलेरियाचे सर्वात विकराल रूप म्हणजे सेरेब्रल मलेरिया, त्यात मेंदूवर परिणाम होतो. अत्यधिक मात्रेत फ ुटलेल्या रक्तपेशी अवयवात साठतात आणि मूत्रपिंडासारखे जीवनरक्षक अवयव निकामी होतात. अशा भीषण अवस्थेत पोहोचल्यावर उपचार न केलेल्या रोग्याचा मृत्यू अटळ असतो. सर्वतोपरी उपचार केल्यावर देखील असे २०% रुग्ण दगावतात. म्हणूनच या रोगाचे लवकरात लवकर निदान करणे आणि योग्य औषधोपचार करणे हे महत्वाचं आहे. सुदैवाने आजमितीला मलेरिया आटोक्यात आणण्यासाठी आपल्याकडे प्रभावी मलेरिया विरोधी औषधे उपलब्ध आहेत.

मैत्रांनो, डास चावणे जिथे नित्याचे आहे तिथे रोज रोज मलेरिया होत कां नाही? एक तर ते डास संक्रमित मादी ॲनोफिलीस असावे लागतात. शिवाय या जातकुळीचे डास चावले रे चावले की लगेच मलेरिया होईल असेही नाही. काही मलेरिया परजीवी मानव शरीरात एक वर्षापर्यंत झोप काढू शकतात. शिवाय आपली प्रतिकारशक्ती अधिक चांगली आहे की या परजीवींची, हा मुद्दा उरतोच!

मलेरियाचे निदान: रोग्याची लक्षणे, विस्तृत शारीरिक तपासणी तसेच रक्त-तपासणी (ब्लड स्मीअर किंवा रॅपिड डायग्नोस्टिक टेस्ट) आणि लक्षणांवर आधारित इतर तपासण्यांच्या आधारे मलेरियाचे निदान करतात. जागतिक आरोग्य संघटनेद्वारे ठरवलेल्या मानकांनुसार सामान्य आणि सौम्य मलेरिया असतांनाच मलेरिया विरोधी औषधांचा वापर करणे उचित आहे. त्यामुळे मलेरिया बाल्यावस्थेत असतांनाच नष्ट होतो.

***

# कवितेच्या लाटावर...







# कवितेच्या लाटावर...



















हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559